# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** संजयनगर पोलीस स्टेशन **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0212 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/08/2022 07:55 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 05/08/2022
   **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/08/2022
   **Time From (वेळेपासून):** 18:51 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:51 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/08/2022 **Time (वेळ):** 06:54 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 012 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/08/2022 06:54 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 3 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** कुपवाड रोड सांगली येथील लक्ष्म, रसिका हटेलचे बाजूस असले , सहयाद्री अर्थ या अपार्टमेंट ,सांगली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री. इंद्रजित अशोक घाटे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with OKEN Scanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सिध्दीविनायक नक्षत्र फलट ,नटी-1, शंभर फुटी रोड, फेडरल ,बके समोर, विश्रामबाग ,सांगली, संजयनगर पोलीस स्टेशन,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सिध्दीविनायक नक्षत्र फलट ,नटी-1, शंभर फुटी रोड, फेडरल ,बके समोर, विश्रामबाग ,सांगली, संजयनगर पोलीस स्टेशन,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुर्यकांत मारुती नलवडे | | | 1. नाना नानी पार्क, आरवाडे पार्क,,रेल्वे स्टेशन समोर, , सांगली वर्ग-1 , संजयनगर पोलीस स्टेशन,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | राहुल शिवाजी कणेगांवकर | | | 1. घर नं 675 शाहुनगर, विजयनगर, तामिरज ,जिसांगली,संजयनगर पोलीस स्टेशन,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)): 100,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब ता. 06.08.2022मी इंद्रजीत अशोक घाटे वय 36 वर्ष व्यवसाय:- कन्ट्रक्टर, अथर्व इंफ्रा, रा. सिध्दीविनायक नक्षत्र अपार्टमेंट फ्लट नं टी-1, शंभरफुटी रोड, फेडरल बँके समोर, विश्रामबाग सांगली ता.मिरज जि.सांगली मो.नं.7719944587.मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझी अथर्व इंफ्रा नावाची कंपनी असून मी नोंदणीकृत कंत्राटदार आहे. मी दि.06.04.2022 रोजी ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग सांगली या कार्यालयामध्ये वारणाली वसाहत येथील विश्रामगृह, सार्वजनिक स्वच्छतागृह, उपहारगृह इ. दुरूस्ती करीता स्विपर, मजुर इ. पुरवणे या कामाची ऑनलाईन ई निविदा भरली होती. त्याप्रमाणे सदरची निविदा मला मंजूर झालेली आहे. सदर कामाची मंजूर निविदा रक्कम 27,43,559/- रूपये आहे.दि.18.07.2022 रोजी माझ्या कंपनीचे मनेजर श्री. योगेश रामचंद्र चौधरी हे कार्यारंभ आदेश घेण्यासाठी ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग सांगली या कार्यालयामध्ये गेले होते. योगेश रामचंद्र चौधरी यांनी त्या ठिकाणी श्री.नलवडे, कार्यकारी अभियंता यांची भेट घेवून त्यांना कामाचा कार्यारंभ आदेश देण्याबाबत विनंती केली असता श्री.नलवडे, कार्यकारी अभियंता यांनी कार्यारंभ आदेश देण्यासाठी कामाची मंजूर निविदा रक्कमेच्या 4 टक्के प्रमाणे साधारण 1,00,000/-रूपये द्यावे लागतील असे मालकांना पाठवून देण्याबाबत सांगीतले. त्यावेळी मी माझ्या घरगुती कामा निमित्त बाहेर गांवी होतो. मी सांगलीमध्ये आल्यानंतर माझ्या कंपनीचे मनेजर श्री. योगेश रामचंद्र चौधरी यांनी मला नलवडे, कार्यकारी अभियंता हे 1,00,000/- रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबतची सविस्तर हकिगत सांगीतली.श्री.नलवडे यांनी मनेजर योगेश चौधरी यांचेकडे 1,00,000/- रूपये लाचेची मागणी करून मला भेटण्यास येण्याबाबत निरोप दिला होता. मी दि.05.08.2022 रोजी नलवडे यांची भेट घेण्यासाठी जाणार होतो. श्री.नलवडे हे माझ्याकडून 1,00,000/- रूपये लाच घेतल्या शिवाय मला कार्यारंभ आदेश देणार नसल्याची माझी खात्री झाल्याने व मला श्री.नलवडे, कार्यकारी अभियंता यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि,01.08,2022 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे हजर होवून श्री.सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना माझी तक्रार सांगून ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग सांगली कार्यालयातील श्री.



Scanned with OKEN Scanner

ठिकाणी आले. घाटगे साहेब यानी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर काढून बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी विचारले वरून पंच जाधव यांनी घडलेली हकिगत सांगीतली. तसेच मी देखील घाटगे साहेब यांना घडलेली हकिगत सांगीतली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकर्डर मधील सापळ्याचे वेळी ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण मी, घाटगे साहेब व दोन्ही पंचानी ऐकून खात्री केली.नलवडे साहेब यांनी मला लाचेची रक्कम् राहुल कणेगावकर यांना देण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाल्याने राहुल कणेगावकर यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजीत करण्याचे घाटगे साहेब यांनी निश्चित केले. घाटगे साहेब यांनी राहुल कणेगाकर यांचे ठाव ठिकाणाबाबत माहिती आहे का असे विचारता मी घाटगे साहेब यांना राहुल कणेगावकर यांना ओळखत असल्याचे सांगून राहुल कणेगावकर काम करीत असलेल्या सह्याद्री कन्स्ट्रक्शनचा पत्ता माहिती असल्याचे व राहुल कणेगावकर यांचा संपर्क क्रमांक माझ्याकडे असल्याचे घाटगे साहेब यांना सांगीतले. राहुल कणेगावकर यांचा ठाव ठिकाण्याबाबत माहिती घेण्यासाठी घाटगे साहेब यांनी कणेगावकर यांना मोबाईलवरून संपर्क करण्यास सांगीतला. त्याप्रमाणे मी माझ्या मोबाईलवरून कणेगावकर यांना संपर्क करून माझ्या मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला. कणेगावकर यांनी माझा कॉल रिसिव्ह केला नाही. त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला व पंच जाधव यांना कणेगावकर यांचे ऑफिसवर पाठवून कणेगाकर यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. घाटगे साहेब यांनी मला, दोन्ही पंचाना तसेच सापळा पथकातील कर्मचा-यास सापळ्या कामी सुचना दिल्या. घाटगे साहेब यांनी त्यांचे पथकातील भिलारे साहेब, पंच माळी, मकानदार पोलीस यांना घाटगे साहेब यांचे कारने रवाना होवून वारणाली येथील

म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग सांगली कार्यालयाच्या परिसरात जावून थांबून संपर्क केल्यानंतर नलवडे साहेब यांना ताब्यात घेण्याच्या सुचना दिल्या. घाटगे साहेब व कलगुटगी पोलीस असे माझ्याकडील कारमधून माझ्या व पंच जाधव यांचे सोबत रवाना होण्याचे ठरवले. घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे भिलारे साहेब, पंच माळी व मकानदार पोलीस घाटगे साहेब यांचे कारने रवाना झाले. त्यानंतर मी, पंच जाधव, घाटगे साहेब, कलगुटगी पोलीस असे माझ्याकडील कारने रवाना होवून विश्रामबाग, लक्ष्मी नगर परिसरातील लक्ष्मी मंदीरा जवळ असलेल्या सह्याद्री अर्थ बिल्डीगच्या समोर दाखल झालो. त्यावेळी मी घाटगे साहेब यांना सदर बिल्डींगमध्ये कणेगावकर यांचे ऑफिस असल्याचे सांगीतले. त्यानंतर घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. तो मी माझ्या पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच जाधव असे कारमधून बाहेर येऊन पायी चालत सह्याद्री अर्थ बिल्डींगमध्ये सह्याद्री कन्स्ट्रक्शन या ऑफिसमध्ये गेलो. त्या ठिकाणी कणेगावकर हजर होते. मी त्यांची भेट घेवून "वर्क ऑर्डस्चे पैसे द्यायचे होते, ते एकदा साहेबांना बोला, वारणालीतील काम साफ सफाईचे सव्वीस लाखाच काम आहे.साहेबांनी तुमच्या कडे एक लाख रूपये द्यायला सांगीतले आहे, थोडे फार कमी करतात का विचारा" असे म्हणालो. त्यावर कणेगावकर यांनी मला "कमी काही करणार नाहीत" असे म्हणाले. त्यावर मी कणेगावकर यांना "काय कमी करतात का बघा जरा" असे म्हणालो. त्यावर कणेगावकर यांनी मला "तुम्हीच विषय काढला पाहीजे" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना साहेबांनी एक लाख रूपये देण्यास सांगीतले आहे असे सांगीतले. त्यावेळी कणेगावकर यांनी त्यांचे मोबाईलवरून कोणाला तरी कॉल करून "घाटे साहेब इथ" असे सांगीतले. कणेगावकर यांनी नलवडे साहेब यांना कॉल केल्याचे माझ्या लक्षात आले. कणेगावकर यांचे मोबाईलवरील संभाषण झाल्यानंतर मी कणेगावकर यांना साहेब काय म्हणाले असे विचारले. त्यावर कणेगावकर यांनी मला "फोन करतो म्हणाले" असे सांगीतले. त्यानंतर काही वेळातच कणेगावकर यांचे मोबाईलवर कॉल आला. सदरचा कॉल कणेगावकर यांनी रिसिव्ह करून "घाटे सर काय कमी होतय का विचारत होते, त्यात काय, एक लाख रूपये" असा उल्लेख करून संभाषण केले. त्यावरून कणेगावकर यांना नलवडे साहेब यांचा कॉल आला असल्याचे माझ्या लक्षात आले. कणेगावकर यांचे मोबाईलवरील संभाषण झाल्यानंतर कणेगावकर यांनी माझ्य कडे पैसे देण्याबाबत हाताने इशारा केला. त्यावेळी मी माझ्या पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशातील लाच रक्कम 1,00,000/- रूपये माझ्या उजवे हाताने बाहेर काढून कणेगावकर यांचे समोर धरली असता. कणेगावकर यांनी सदरची रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून दोन्ही हाताने मोजून त्यांचे डावे हाताने त्यांचे टेबलवर डावे बाजूस ठेवली. त्यानंतर मी व पंच जाधव असे कणेगावकर यांचे ऑफिसमधून बाहेर आलो मी माझा डावा हात माझे डोक्यावरून फिरवून लाच स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. लागलीच घाटगे साहेब, व पथक माझ्या जवळ आले. घाटगे साहेब यांनी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून मला बाजूला थांबण्याबाबत सांगीतले.
काही वेळानंतर भिलारे साहेब, पंच माळी असे नलवडे साहेबांना सोबत घेवून मी थांबलो त्या ठिकाणी आले. मी भिलारे साहेब यांना कणेगावकर यांचे ऑफिस याच बिल्डीगमध्ये असल्याचे सांगीतले. भिलारे साहेब व पंच माळी असे सह्याद्री अर्थ बिल्डींग मध्ये गेले.
काही वेळाने घाटगे साहेब, भिलारे साहेब, दोन्ही पंच असे नलवडे व कणेगावर यांना सोबत घेवून बिल्डींगच्या खाली आले. घाटगे साहेब यांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये बसण्यास सांगून वाहनामध्ये अंधार करून माझे हात व कपडे तपासण्यात आले. त्यावेळी माझे उजवे हाताचे बोटावर व पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशाचे तोंडास अँन्थ्रासिन पावडरची चकाकी दिसून आली. त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला बाहेर जावुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर जावुन थांबलो. काही वेळाने घाटगे साहेब यांनी मला अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे माझ्या कारने रवाना होवून अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर झालो.
घाटगे साहेबांनी त्यांची पुढील कारवाई सुरु ठेवली. त्यानतर थोडयावेळाने घाटगे साहेबांनी मला बाहेरुन बोलावून घेतले. त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली, त्यानंतर मला कार्यालयाच्या बाहेर जावून थांबण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी बाहेर जावून थांबलो. त्यानंतर पुन्हा थोडया वेळाने घाटगे साहेब यांनी मला बोलावुन घेवुन सापळयाची हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगीतली. घाटगे साहेबांनी घडले घटनेचा सविस्तर पंचनामा केला.
सदर कारवाई दरम्यान नलवडे यांचे पुर्ण नाव श्री सुर्यकांत मारूती नलवडे, कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, वारणाली सांगली रा.नानानानी पार्क, आरवाडे पार्क रेल्वे स्टेशनसमोर सांगली व कणेगाकर यांचे पुर्ण नाव राहुल शिवाजी कणेगावकर वय 37 वर्ष व्यवसाय कन्स्ट्रक्शन रा. घर नं. 675 शाहुनगर विजयनगर ता. मिरज जि.सांगली असे असल्याचे मला समजले आहे.

मी ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग सांगली या कार्यालयामध्ये वारणाली वसाहत येथील विश्रामगृह, सार्वजनिक स्वच्छतागृह, उपहारगृह इ. दुरूस्ती करीता स्विपर, मजुर इ. पुरवणे या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी नलवडे यांनी माझ्याकडे 1,00,000 रूपये लाचेची मागणी केली. सदरची लाच रक्कम नलवडे यांचे नातेवाइक राहुल शिवाजी कणेगावकर यांनी नलवडे यांचे सांगणेवरून माझ्याकडून स्विकारली म्हणून माझी त्या दोघां विरूध्द फिर्याद आहे.

माझा मराठी मध्ये टाईप केलेला वर्दी जबाब मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेला आहे.

समक्ष

स्टेशन हवाली अंमलदार
विजयनगर पोलीस ठाणे सांगली

हा दिला वर्दीजबाब,

Indrajiet



Scanned with OKEN Scanner

पोलीस उप अधीक्षक कार्यालय,

सांगली फोन नंबर 0233-2373095

जा.क्र.-एसीबी/सांगली/सापळा-15/2022

अँन्टी करप्शन ब्युरो, बदामचौक,

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)** **or (किंवा)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** mahesh maruti dongare

**Rank (पद):** SI (Sub-Inspector)

**No.(क्र.):** 12501000362mm **to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Indrajeet

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** sanjay Yuvraj Kshirsagar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402SYKM8501R

स्टेशन प्रभारी अंमलदार
संजयनगर पोलीस ठाणे सांगली



Scanned with OKEN Scanner